नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका कार्यालय,
जा. नं. / नगररचना विभाग / अंतिम / पंचवटी / ५६ / १०७
दिनांक २८/८ / २००७

प्रति, चेअरमन, हर्ष हिलेरा जव्हेरी को-ऑप.हौसींग सो.लि. व चेअरमन, राधाबाई जव्हेरी को-ऑप. हौसींग सो.लि.नाशिक द्वारा- श्री. जी. व्ही. कटाळे, आर्कि. नाशिक

विषय : नाशिक शिवारातील स. नं. / गट नं. १५९/२/१/१ मोजणी, नकाशाप्रमाणे व ७/१२ उताऱ्याप्रमाणेचे जागेतील प्लॉट नं. १ ते २१ चा लेआऊट नकाशा अंतिम मंजुरी करणेबाबत.

नाशिम-५
दस्त क्र. ८४८ /२०१७
३० ऑगस्ट २०१७

संदर्भ : तुमचा दिनांक २४ / ०५ / २००७ चा अर्ज व नकाशे.

महाशय,

वरील संदर्भान्वये कळविण्यात येते की, नाशिक शिवारातील स. नं. १५९/२/१/१ मोजणी नकाशा प्रमाणे व ७/१२ च्या उताऱ्याप्रमाणे जागेतील नियोजित लेआऊटचा नकाशा तांत्रिकदृष्ट्या असल्याने त्यास इकडील जा. क्र. एल.एन.डी. / डब्ल्यू.एस. / टीपीडी/१०० (पेचवटी) - / - / दिनांक ३०/१०/२००२अन्वये टेंटटिव्हली मंजुरी शर्त नंबर १ ते १७ अनुसार मंजुरी देणेत आली होती. त्यानंतर तुम्ही सदर शर्तीनुसार सदर नियोजित लेआऊट प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर मोजणी करुन, प्लॉटस् रस्ते व खुली जागा यांचे हद्दीचे कायमचे दगड रोवून सदर कॉलनीमध्ये कॉलनी रस्ते तयार करुन दिले आहे त्याचप्रमाणे पाईप लाईन करिता रक्कम रुपये २,८४,७००/- पावती क्र. / बुक क्र. ०००८९ / ०२७५ दिनांक २२/०८/२००७ अन्वये या कार्यालयात भरलेली आहे.

सबब तुम्ही सदर नियोजित टेंटटिव्हली मंजूर लेआऊटचे शर्तीनुसार योग्य ती पूर्तता केलेली असल्याने सदर जागेतील लेआऊटच्या नकाशास अंतिम मंजुरी (फायनल लेआऊट) खालील शर्तीवर देण्यात येत आहे.

- शर्ती -

१) सदर कॉलनीतले प्लॉट, रस्ते व खुली जागा यांचे हद्दीचे दगड हालवू नये व मंजूर लेआऊट प्रमाणे कोणतेही प्लॉटचे क्षेत्र जागेवर प्रत्यक्ष मोजले असता कमी अधिक भरता कामा नये.

२) मंजूर लेआऊट मधील कोणत्याही प्लॉटचा उपयोग फक्त राहणेसाठी करावा. अन्य कोणताही वापर या कार्यालयाची परवानगी घेतलेशिवाय करू नये.

३) मंजूर लेआऊट मधील कोणतेही प्लॉटचे यापुढे उपविभाजन करणे किंवा एकत्रीकरण करणे झाल्यास इकडील पूर्व परवानगीशिवाय करू नये.

४) मंजूर लेआऊटमधील प्लॉटमध्ये बांधकाम करणेपूर्वी या कार्यालयाची पूर्व परवानगी (बांधकाम परवानगी) घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम करू नये.

५) सदर कॉलनीमध्ये तुम्ही पाण्याच्या लाईनसाठी रक्कम भरलेली असली तरी महानगरपालिकेची सदर भागातील पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्याखेरीज पूर्ण कॉलनीत पाणीपुरवठा केला जाणार नाही.


६) मंजूर लेआऊट मधील रस्ते व खुल्या जागा नाशिक महानगरपालिकेच्या ताब्यात दिनांक -/-/०५/२००७ ह्या खुल्या जागेचे क्षेत्र १११२.०० चौ. मीटर करारान्वये भरलेले आहे.

७) सदर लेआऊटमध्ये आपण पथदीपांची व्यवस्था साठी संपूर्ण विकासशुल्क विद्युत विभाग पथक / - / - / - / दिनांक - अन्वये केलेली असून सुमारे [illegible] चार्जेस रक्कम रुपये ३,७९,६००/- पावती क्र. ०००८९ बुक क्रमांक ०२७५ दिनांक २२/०८/२००७ अन्वये भरलेली आहे.

JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 नाशिक

८) सदरहू अभिन्यास हा मा. ज. क. म. कार्यालयाकडील पत्र क्र. –

दिनांक – ला अधीन राहून देणेत येत आहे.



९) सदर अभिन्यासांतील कॉलनी रस्ते, डी.पी. रोड व सोडली जाणारी खुली जागा ह्या क्षेत्राचा ७/१२ उतारा वेगळा करून त्यावर 'मनपा नाशिक' च्या नावे इमारत परवानगीपूर्वी लावणेत यावे.

१०) सदरच्या अभिन्यासास 'बिनशेती परवानगी' मा. जिल्हाधिकारी सो. नाशिक यांचेकडून पत्र क्रं.महा/कक्ष-३/४/बि.शे.प्र.क्रं./१०६/२००६ नाशिक दि. ०४/०१/२००७ अन्वये मिळालेली आहे.

११) तालुका निरिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाचा सिमांकित अभिन्यास भुखंडाचा नकाशा इमारत परवानगीपूर्वी सादर करावा. सदरची पूर्तता मोजणी सहित्यांचा खर्चाने याबाबत अन्यथा परवानगी रद्द करणेची राहील.

वरील शर्तीनुसार सदरचे लेआऊट नकाशास अंतिम मंजुरी देणेत येत आहे. सोबत मंजूर लेआऊट नकाशाच्या प्रति जोडल्या आहेत.



सहाय्यक संचालक नगररचना
नाशिक महानगरपालिका, नाशिक

१) अध्यक्ष,
आर्की. व इंजिनिअर्स असो.
नाशिक

२) अपर जिल्हाधिकारी व सक्षम अधिकारी
मा. ज. क. म. नाशिक

३) मा. जिल्हाधिकारी सो. नाशिक.
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.

४) मा. स. सं. न. र.
नाशिक शाखा, नाशिक.